# प्रकरण चौथे

# संकलित साहित्याची वाङ्‌मयीन गुणवत्ता

| | |
|---|---|
| ४.१ | प्रास्ताविक |
| ४.२ | उत्सवामधील समाजदर्शन |
| ४.३ | मौखिक गीतांची वाङ्‌मयीन गुणवत्ता |
| ४.३.१ | विधिगीते |
| ४.३.२ | भाषिक गुण विशेष |
| १. | अलंकार |
| २. | बोलीभाषा |
| ३. | कल्पकता |
| ४. | भावसौंदर्य |
| ५. | धृवपदाचा अचूक वापर |
| ६. | वाक्‌प्रचार व म्हणी |
| ७. | भगतांच्या गीतांचे प्रयोगरूप |
| ८. | वाद्यांची आणि संगीताची साथ |
| ९. | श्रोत्यांच्या मनावर होणारा परिणाम |
| ४.४ | आख्यायिकांची वाङ्‌मयीन गुणवत्ता |
| ४.४.१ | घटनाप्रसंगाच्या चित्रणाचे स्वरूप |
| ४.४.२ | वातावरण निर्मिती |
| ४.४.३ | आख्यायिकांतून घडणारे धार्मिक समाजजीवन |
| ४.४.४ | आख्यायिका : लोकसंस्कृतीच्या वाहक |
| ४.५ | समारोप |

# प्रकरण चौथे

# संकलित साहित्याची वाङ्मयीन गुणवत्ता

## ४.१ प्रास्ताविक :

माणकेश्वर येथील लोकजीवनात प्रचलित असलेली शिव - सटवाई विषयक विविध मौखिक सामुग्रीचे स्वरूप येथपर्यंत पाहिले. याच्याआधारे संकलित शब्द माध्यमातून साकार झालेल्या साहित्याची वाङ्मयीन गुणवत्ता तपासणे मला आवश्यक वाटते. शिव मंदिरातील स्तंभलेखावर कोरलेल्या शिलालेखाच्या भाषिक वैशिष्ट्यावरून प्रस्तुतचा शिलालेख यादवकालीन मराठीच्या लक्षणीय वैशिष्ट्यांचे जतन करताना दिसतो.

शिव - सटवाई यात्रा, पूजाविधी तसेच उत्सव कालावधीत गायिल्या जाणाऱ्या गीतातून माणकेश्वर येथील जनसमुदाय प्राचीन इतिहास, संस्कृतीशी आजच्या वैज्ञानिक युगातही भक्कम नाते जोडताना दिसतो. ही जोडलेली धार्मिक, सांस्कृतिक उन्नतीची नाळ वर्तमानकाळात देखील महाशिवरात्र, नवरात्र, कुलधर्म, कुळाचार, कुलदैवते, व्रतवैकल्ये यांच्या माध्यमातून टिकून असलेली दिसते. परंपरा संवर्धनामध्ये माणकेश्वरच्या ग्रामस्थाबरोबरच परिसरातील भक्त, स्त्री-पुरूष, अबालवृद्ध तसेच लोकसंस्कृतीच्या उपासकांची ही कामगिरी उल्लेखनीय आहे.

## ४.२ उत्सवामधील समाजदर्शन :

उत्सव परंपरेच्या लोकस्मृती आणि त्यातील टिकावूपणा माणकेश्वर येथील मानवी जीवनाशी एकरूप झाल्याचे असंख्य मौखिक गीत, आख्यायिकातून आढळून येते. उत्सव कालावधीत एकाच मानसिकतेने, एकाच ठिकाणी, एकाच वेळी भिन्न भिन्न मनोकामना जपणारा लोक समाज सुख, दु:ख विसरून एकीने समभावनेच्या पातळीवर उतरलेला दिसतो. ही लक्षात घेण्यासारखी बाब आहे. शिव - सटवाई, कोपराई, कौल, गोटी प्रदक्षणा, नवसपूर्ती यामागील सामाजिक संदर्भ अभ्यासनीय आहेत. तत्कालीन समाजमानस, त्यांची संस्कृती,

सवयी, धार्मिक कल्पना, समजुती, विधी, चालीरीती, रूढी, परंपरांचे अवलोकन करण्यासाठी ह्या माहीतीस अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजही माणकेश्वर येथील लोकसमुदाय आपल्या दैनंदिन जीवनात वरील घटकांशी घट्ट चिटकून असलेल्या दिसतो. आख्यायिकांचा सामाजिक दृष्टिने विचार करताना त्यातून प्रकट होणारे आचार-विचार यांचे चित्रण कोणत्या तऱ्हेने आलेले आहे आणि त्यातून माणकेश्वर परिसराचे जीवन चित्रण कसे प्रत्ययाला येते याचा आढावा घेता येतो.

## ४.३ मौखिक गीतांची वाङ्‌मयीन गुणवत्ता :

स्त्री गीते, ओव्या, लोककथागीते, भगतांची गीते, ओवी आख्यान म्हणजे पारंपरिक जीवनाचा आरसाच होय. मनातील भावना ज्या बोलून दाखवता येणार नाहीत, त्या व्यक्त करण्याचे सामर्थ्य समूहाच्या सहकार्याने वरील रचनातून होताना दिसते. परंपरेने चालत आलेली रूढी, कुलाचार, धर्माचरण, सण-समारंभ इत्यादी गोष्टी पाळण्याकडे स्त्रियांचा अधिक कल असतो. तिच्या या वृत्तीतूनच गीत ओव्यांची जोपासना होते. ही सारी रचना मौखिक परंपरेने जतन केलेली आढळते. अशा 'अनाम' व्यक्तीचा मौखिक परंपरेने जतन करून ठेवलेला हा वाङ्‌मयीन आविष्कार असतो ती भूतकाळातील कृती असून त्याला अनेक शतकांची परंपरा लाभलेली आहे.

### ४.३.१ विधिगीते :

पुत्रजन्म, षष्ठीपूजा, मुंज, नामकरण विधी, गर्भारपण, लग्नविधीच्या प्रसंगी अनेक स्त्रिया एकत्र येऊन आनंदाच्या भावनेतून विधी आचरण प्रसंगी स्त्रिया गाणी गातात. हे विधी गीतांशी निगडीत असल्याचे दिसून येते. सटवाईची पूजा मूल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी करतात. याप्रसंगी या लोकदेवतेविषयी श्रध्दा व्यक्त करणारी गीते स्त्रिया गातात. डॉ. शरद व्यवहारे यांच्या 'लोकवाङ्‌मय रूप-स्वरूप' या पुस्तकातील गीत पुढीलप्रमाणे -

'माय सटवाई सटवाई
रानात तू गं राही
नशीब बाळाचं लिही
पूजा मी बांधिते आई सटवाई
राजाचं सुख आन सम्रत बाळा ठाई ॥'

बाळाचे विधिलिखित लिहिणाऱ्या सटवाईविषयी आदराची गीतं गायलेली आढळून येतात. वरील आशयाशी साम्य असणारं 'आई गं सटुबाई' हे विधिगीते वांगी ता. भूम येथील भामाबाई मसलकरीन यांनी गायिले -

'आई गं सटुबाई, माझ्या नवसाला पाव
घेते तुझं नाव, माझ्या नवसाला पाव ॥ धृ ॥
आई गं सटुबाई, काय लिव्हलस अक्षर
लिव्हलस अक्षर, गं नाही कुणाला चुकणार ॥ १ ॥
सटवू बाईच्या राऊळी, दिवा जळतो तुपाचा
जळतो तुपाचा, माझ्या सावळ्या रूपाचा
उजेड पडला, सटु बाईचा रुपाचा ॥ २॥'

सटवाईचा अनभिज्ञ अक्षरलेख, तिचं सावळ रूप भगतांच्या मनात ठाव घेताना दिसते. माणकेश्वर येथील अश्रू बन्सी तेलंग यांनी जावळ (बट काढणे) या संस्कार विधी संदर्भात सांगितलेले गीत असे -

'माणकेसरीचं देऊळ, माणकेसरीचं राऊळ
मला दिसतया छान, सटू मायचं हाय ठाण ॥ १ ॥
सटू माईच्या राऊळी, कोण बसली एकली
बसली एकली तान्ह्या बाळाला चुकली ॥ २ ॥

सटू बाईचं राऊळ, कोण झाडीती केसानं

झाडीती केसानं, बाळ मागती नवसानं ॥ ३ ॥

सटू माईचं राऊळ, कोण झाडतो बामण

झाडतो बामण, हाती कौल घेऊन ॥ ४ ॥

सटू माईला येताना, घेऊन सोन्याची कातर

सोन्याची कातर, जावळ नवसाचं उतर ॥ ५ ॥

नवसाच्या बाळाला ह्या..., बाई ठेवियली बट

सोडा सटवाईला पाट ॥ ६ ॥

विधिप्रसंगी गायली जाणारी गाणी विधीतील निरनिराळ्या क्रियांशी निगडीत असल्यामुळे क्रिया अर्थपूर्ण होऊन भक्ताच्या मनाला विधी पूर्तीचे मानसिक आणि भावनिक समाधान मिळाल्याचा आनंद होतो.

## ४.३.२ भाषिक गुण विशेष :

रचनेचे सामर्थ्य अभिव्यक्तीतून ठळकपणे प्रकट होत असते. शिव - सटवाईच्या आख्यायिका गद्य-पद्य स्वरूपात निर्माण झाल्या आहेत. असे आपणास सदर प्रबंधिकेतील संकलित आख्यायिकांच्या आधारे म्हणता येईल. एकच कथासूत्र कायम ठेवून कथेची रोचकता काही भाषिक गुणविशेषाच्या आधारे वाढविली जाते. कथेचा विकास व्हावा, कथेस गती यावी म्हणून लोकतत्त्वांचा वापरही करण्यात आलेला दिसतो. शिव-सटवाईच्या आख्यायिका आणि गीतामध्ये अलंकार, म्हणी यांचाही आढळ झालेला आहे.

### १. अलंकार :

शब्दालंकार व अर्थालंकार याचा रचना तंत्राच्या दृष्टीने विचार करण्यात आलेला आहे. यमक, अनुप्रास, उपमा यासारख्या अलंकाराचा विचार येथे अभिप्रेत आहे. त्यामुळे

शिव - सटवाईच्या आख्यायिका, कथागीतास काव्य सौंदर्य प्राप्त झाले आहे. 'सटवा मायला पूर तयाला' या गीतात देवी भगत लहान मुलाला 'वाघाची' उपमा देऊन उत्प्रेक्षा अर्थालंकाराचा वापर कल्पनेच्या जोडीने करताना आढळतो.

'म्हातारा शंभू देव । त्याची गळती लाळ ।

आणि त्याची गळती लाळ । गिरजा मसूराची दाळ ॥

'गिरजा मसूराची दाळ', 'गिरजा केवड्याचं पान' यासारख्या उपमा तिच्या रूपाला समर्पक ठरतात. 'शिव-पार्वतीचा डाव' आणि 'गिरजास्वयंवर ओवी आख्याना'त अतिशयोक्ति आलेली आहे.

## २. बोलीभाषा :

लोकगीते लोकसमूहाच्या बोलीत असतात. आणि बोलीभाषेची प्रवृत्ती स्वतंत्र असते. बोली मौखिक असल्यामुळे प्रमाणभाषेची बंधने तिच्यावर मर्यादा घालू शकत नाहीत. ही गीते बोलीभाषेतून साकार होत असल्याने ती सर्वसामान्य लोकांच्या हृदयाला स्पर्श करतात. ग्रामीण बोली भाषेतील शब्दोच्चार, सुरेल आवाज, सहकाऱ्यांची साथ, सवाद्य, अरोह-अवरोह स्वरूपातील गीत गायन या वैशिष्ट्यांनी ही गीते श्रवणीय वाटतात. बदलत्या काळानुसार नव्या गोष्टींची भर गीतात पडलेली दिसून येते. प्रादेशिक बोलीभाषेचा अचूक वापर हे या गीतांचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होय.

'मुंडे पुकारे रि मेरी माँ, मुंडे पुकारे

मुंडे को केस लगाये, ओ माँ ऽऽ बाई'

किंवा

आंबाडे की भाजी रे मेरी माँ, झारी की रोटी

बाई, सटवाई को होरूर लगायें हो माँऽऽ बाई

लोदी स्त्रियांची हिंदी मिश्रीत बोलीभाषेतील गीत रचना श्रवणीय असून भाषिक अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. गीते 'मौखिक' आविष्कार असल्यामुळे चैतन्ययुक्त आहेत.

### ३. कल्पकता :

शब्द चमत्कृतीमुळे सत्य आणि कल्पना यांचे मिश्रण झालेले आहे. अनुभवाचा वेगळा आकार त्यातून प्रतीत होतो. घटना प्रसंगाची योग्य प्रकारे संगती लावलेली असते. शिव-सटवाईच्या आख्यायिका, कथागीतातून अशी रचना झाल्याने ज्ञान व आनंदप्राप्ती होते. लोकश्रद्धा, लोकविश्वासाबरोबरच, कल्पनाविलास, रचनाचातुर्य आणि गर्भीत अर्थाच्या अनुरोधाने गीत, आख्यायिका, स्त्रीगीते, ओव्या वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. उदा. 'शिव-पार्वतीचा डाव' ह्या पौराणिक कथात्मक लोकगीतातील लग्न प्रसंगाचे वर्णन, पार्वतीच्या युक्तीवादाला अचूक अशी कल्पनाचातुर्याची जोड लाभली आहे. 'गिरजास्वयंवर ओवी आख्याना' मध्ये भगताच्या कल्पकतेची जाणीव आपणास पदोपदी आढळते.

### ४. भावसौंदर्य :

'गिरजास्वयंवर ओवी आख्यान' हे कथात्मक (narrative) असले तरी भावकाव्याचे विशेष त्यात सहजपणे निर्माण होतात. उदा.

अठरा धारा पाजून, बराच उपकार केला ।
लोटून देता आम्हाला । परक्याच्या घराला ।

अशा अनेक रचनातून मानवी जीवनातील विविध भावछटांचे मनोहारी व हृदयगम असे प्रतिबिंब दिसून येते. कोपराईच्या आख्यायिकेतून वात्सल्याची भावना हळूवारपणे व्यक्त होताना दिसते. बहिणीची भावावरील माया 'मेल्या मुडद्या ऽऽ' या आख्यायिकातून व्यक्त होते. काव्यात्मता, जिव्हाळ्याची भाषा, आंतरीच्या भावनेचा ओलावा, देव-देवताविषयीच्या

नितांत श्रद्धा आणि वर्णन, शैली, प्रतिमासृष्टी, शब्दयोजना, श्रद्धा आणि वर्णन शैली, प्रतिमासृष्टी, शब्दयोजना, स्वरमाधुर्य या सगळ्या वाङ्मयीन गुणामुळे पोतराजाचे ओवी आख्यान कथागीताप्रमाणे सलगपणे गायिलेले नसून मध्येच पोतराज स्वत:ची गद्य संहिता कथन करीत प्रक्षेकांच्या मनाचा ठाव घेताना दिसतो.

### ५. धृवपदाचा अचूक वापर :

उत्सव कालावधीत तसेच पूजाविधी प्रसंगी गायिलेल्या अनेक गीतात पुन्हा पुन्हा आवृत्त होणाऱ्या धृवपदाला फार महत्त्व असल्याने धृवपदाने गीताला प्रारंभ होऊन काही कडव्यानंतर 'कुई ऽऽ कुई ऽऽ कुई ऽऽ कुई ऽऽ कोंबडा कुकतो' किंवा 'हिरव्या साडीला पिवळी किनार गं ऽऽ', 'माणकेश्वरची सटवाई मैना... मैना... गं ऽऽ' अशा वारंवार धृवपद गायनातून सुंदर स्वरांचा साज चढविला जातो. त्यामुळे गीते आणखी नादमय बनतात. काही वेळा गीतातून निरर्थक शब्द वापरलेले दिसतात. परंतु ते शब्द अकृत्रिम असून सहजतेने निर्माण झालेले असतात.

### ६. वाक्‌प्रचार व म्हणी :

लोकजीवनात म्हणींना महत्त्वपूर्ण स्थान आहे. गावाचे विशेष, स्थळांची नावे, ग्रामदैवते, त्यांचा इतिहास, लोकांची वागण्याची पद्धती, संस्कृती, समाजातील संकेत, रूढी, परंपरा, दैवतविषयक आख्यायिका ह्यांच्या कौशल्यपूर्ण मिसळीतून अनुभवाच्या जोरावर जनसमुदाय हा ठेवा म्हणींच्या माध्यमातून जतन करत असतो. दैनंदिन जीवनात अशा म्हणी तोंडातोंडी सर्व गावभर प्रचलित झालेल्या दिसतात. माणकेश्वर येथील लोकांना ग्रामजीवनातून आलेल्या अनुभवाच्या आधारावर त्यांच्याशी चर्चा करून संकलित केलेल्या लोकदैवत विषयक वाक्‌प्रचार व म्हणी पुढीलप्रमाणे -

१) गाव हाय माणकेश्वर तिथं ३३ कोटी ईश्वर

२) भोळं शंकर अन् शहाणी पारबती

३) शंकरापुढचा नंदी

४) लाईफ है जिनकी न्यारी, ऐसे है भोले भंडारी।

५) शिव ने तिमिर मिटाया, ज्योत से ज्योत जगाया।

६) अति शहाणा त्याचा बैल रिकामा (ब्रह्म, सटवाई, शंकर यांना अपत्य नसल्याकारणाने रूढ)

७) लंकेची पार्वती

८) सटवा मल्हारी

९) म्हसोबाला नाही बायको अन् सटवाईला नाही नवरा

१०) ब्रह्मा-सटवीचा लिखा, पडा ना चुका

११) सटवीचा लेखा; नाही पडला चुका

१२) कर्माच्या आडुश्याला इवसी येणे

१३) बाईची जात, कांद्याची पात (कोपराईच्या नवसाविषयी)

१४) गावात गाव माणकेश्वर, नादी लागला तर होशील येडसर

या उत्स्फूत रचनेतून समाजातील मानवी जीवन व्यवहाराचे, परंपरा आणि कल्पना वैभव इत्यादी गोष्टींचे चित्रण होते. वरील लोकोक्ती माणकेश्वर येथील लोकसमुदाय बोलीभाषेत वापरताना आढळतो. त्यांच्या नेमका अर्थ वेगळा असला तरी; इथे कोणत्या अर्थानुरोधाने त्यांचा वापर केला आहे याचा संदर्भ मागील प्रकरणातील गीत, आख्यायिकात आला आहे. लोकभाषा ही स्थानिक वैशिष्ट्यांनी आणि वाक्यप्रचार आणि म्हणींनी युक्त असते. मौखिक वाङ्मयाचा अभ्यास करताना मौखिक परंपरेतील लोकभाषेत रूढ असणाऱ्या वरील घटकांचाही अभ्यास आवश्यक ठरतो.

## ७. भगतांच्या गीताचे प्रयोगरूप :

शिव - सटवाई यात्रा, उत्सव दरम्यान लोक संस्कृतीचे भगत पोतराज, आराधी,

प्रयोगरूप गीते गाऊन लोकदैवतांचा महिमा वर्णन करतात. पारंपरिक वेशभूषा, खांद्यावर लक्ष्मीआईचा कोरडा, काळकभिन्न टणक शरीर, ओठावर पिळदार मिशा, कपाळी हळदी कुंकवाचा मळवट, कमरेला अभरान, त्यांच्याभोवती गच्च आवळून बांधलेल्या घुंगराचा पट्टा, पायात जाड वाकी, मोकळे केस सोडून हलकीच्या कडक आवाजाबरोबर अनघड शैलीने नाचत-डुलत अभिनयासह पोतराज दैवतविषयक गीते, कथागीते, ओवी आख्यान गाताना दिसतो.

पाव पाव आई ऽऽऽ अन् तू सटवा बाई ऽऽऽ
आलो मी तुझ्याकडं ग ऽ गऽऽ ग ऽऽ ॥ धृ ॥
लवकर उठनं पुनवच्या पहाटं, नवा नवा थाट
आता निघू या देवाला गं ऽऽ
दिवा जळतो लोण्याचा ऽऽ आं ऽऽ
दिवा जळतो लोण्याचा
आईचा शिनगार सोन्याचा
नवस केला अन् पाव नवसाला
आलो मी तुझ्या कडं ग ऽऽ ग ऽऽ ग ऽऽ

अभिनय, नृत्य, नाट्य, संगीत, बोलीभाषेतील शब्दरचना उदा. इळ, गिलास, बावडीत इ. या सर्व अंगांनी ही गीते महत्त्वपूर्ण ठरतात.

निघालं डमडम, चला गं जाऊ माणकेसराला
निघालं डमडम, बसा गं चला माणकेसराला ॥ धृ ॥
अगं दुर्ग भाऊ आला, हळद कुंकू देऊन गेला
आणि हळद कुंकू सटवा बाईला ॥ १ ॥
अगं दुर्ग भाऊ आला, लिंब, नारळ देऊन गेला

लिंब, नारळ देऊन सटवा बाईला ॥ २ ॥
अगं दुर्ग भाऊ आला, चोळी-पातळ देऊन गेला
आणि चोळी पातळ देऊन सटवा बाईला ॥ ३ ॥

आराध्याचा साज परिधान केलेले भगत देवीची गाणी म्हणताना आपल्या प्रवासातील घडामोडीचा, तत्कालीन परिस्थितीचा अंतर्भाव गीतात नकळत करताना आढळतात. त्यांच्या अशा वास्तव प्रसंगावरील गीत गायनाने गाण्यांना प्रयोगरूप प्राप्त होते. भोवतालची मंडळी हे आपलीच गाणे म्हणतात म्हणून नकळत या मेळ्याकडे ओढले जातात. डमडम हे आर्थिक दृष्टीने सर्वसामान्यांना परवडणारे वाहन आहे. प्रत्येक कडव्यानंतर 'निघालं डमडम ऽऽ' या पालुपदाच्या रचनेने गीत गायनात गोडवा निर्माण होताना दिसतो. ही गीते सवाद्य, प्रसंगी नाचून-गाऊन, साभिनय, चित्रपट गीतांच्या चालीवर गायल्यामुळे ह्यांना प्रयोगरूप प्राप्त होते

## ८. वाद्यांची व संगीताची साथ :

देवीचा भगत पोतराज हलगी, कमरेला घुंगराचा पट्टा घालून पायात चाळ बांधून सवाद्य खड्या आवाजात प्रसंगी नाचून गाणी म्हणताना दिसतो. आराधी भारतीय बैठक मांडून देवी भगत तसेच श्रोत्यांच्या सहाय्याने ढोलकी, तुणतुणे, झांज यांच्या साथीने गीते गातात. भगतांच्या गीतांना वाद्य व संगीताची जोड असल्यामुळे गीत श्रवणात रंजकता निर्माण होते. सामूहिकपणे आरती चालू असताना घंटा, झांज, इत्यादी वाद्य वाजवून प्रसंगी शंख फुकून टाळ्यांच्या ठेक्यात भक्त आरती म्हणतात. वाद्य-संगीताच्या जोडीने गीत गायनात जीवंतपणा, नादमयता प्राप्त होते.

## ९. श्रोत्यांच्या मनावर होणारा परिणाम :

शिव - सटवाईच्या आख्यायिकांचे निवेदन होत असताना विविध स्वरूपाचे भावनिक परिणाम श्रोत्यांवर होत असतात. विनोदी प्रसंग निर्मितीतून श्रोत्यांच्या मनावरील ताण हलका

केला जातो. गंभीर प्रसंगांना रंजकतेचे रूप दिले जाते. त्याआधारे करमणूक केली जाते. अनेक आख्यायिका, गीतातून 'कोपराई विषयी' रचनाकाराच्या कल्पकतेनुसार लहान बालकाचा कोपुर गिळल्याच्या घटनेचा संदर्भ आला आहे. श्रोत्यावर आणि लोकमानसावर कोपराईचा प्रभाव पडल्याचा आणि आजही तो टिकून असल्याचे जाणवते. मंदिर, शिव-सटवाई ह्यांच्याविषयी लोकांच्या मनात आदर, विभिन्न कल्पना असल्या तरी लोक देवताविषयी मनामध्ये भीती असल्याचे दिसून येते. परंतु ही दैवते मानवी कल्याणासाठीच आहेत; आपण केवळ निमित्त मात्र आहोत अशी भावना लोकांमध्ये असलेली आढळते.

परंपरेने चालत आलेल्या गीतातून नित्यनूतनता, सामूहिक तसेच व्यक्तिगत मनाची अभिव्यक्ती आणि त्यांना प्रसंगी लाभलेली सुरावट हे विशेष आढळतात. परंपरेनुसार चालत आलेली ही लोकसरीता अनेकविध विशेषांनी नटून परंपरेचा वारसा जपणूकी बरोबर आपल्या सभोवतालच्या लोकजीवनाला आनंदाचा प्रत्यय देताना दिसते. विधी संबद्धता, संकेत, गेयता भगतांच्या गीतांना लाभलेली पारंपरिक संगीताची साथ, सार्वकालिकता, लवचिकपणा, बोलीभाषेचा अचूक वापर  इत्यादी वाङ्मयीन गुणांनी परिपूर्ण भरलेली गीतरचना आढळते.

लोकसंस्कृतीच्या उपासकाकडून संकलित केलेल्या संहितापेक्षा ध्वनिसंकेत, ध्वनिपरिणाम, कथनकाराचा तसेच गायकाचा मुद्राविभ्रम, अभिनय, प्रसंगी नृत्य-नाट्य या सर्वांचा मेळ घातल्याने आशय ग्रहणामध्ये उठावदारपणा येतो. कोणत्या पार्श्वभूमीवर, कुणासमोर, एकट्यानेच की समुहाने हा मौखिक आविष्कार सादर केला ह्यांचेही भान ठेवावे लागते. ही सर्व माहिती लिपीबद्ध केल्याने स्थिरावते; म्हणून मौखिक स्वरूपातील लोकसाहित्याचा अभ्यास गीतांच्या संहिता बरोबरच नाट्य, संगीत, अभिनय, नृत्य, प्रयोगरूप, श्रोत्यांचा सहभाग, भाषा या अनुषंगाने करणे आवश्यक वाटते. गीते लोकजीवनातील बोलीभाषेत असल्याने ग्रामीणते बरोबर भाषिक आणि वाङ्मयीन दृष्टीने त्यांची संहिता लक्षवेधी ठरते. ही मुखोद्गत माहिती लिपीबद्ध करणे आज काळाची गरज बनलेली दिसून येते.

## ४.४ आख्यायिकांची वाङ्‌मयीन गुणवत्ता :

माणकेश्वर येथील अनेक आख्यायिकातून धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक घटनाप्रसंग, लोकसंस्कृतीबरोबरच लोकजीवनाचे स्मृतीरूपाने केलेले जतन महत्त्वपूर्ण आहे. सामाजिकता सांस्कृतिक विशेष तत्कालीन समाजाच्या रूढी, प्रथा, परंपरा, दैवतविषयक समजुती जाणून घेण्यासाठी आख्यायिका उपयोगी ठरतात. मूळ आख्यायिकांचा कर्ता अज्ञात असून परंपरेने लोकस्मृतीच्या स्वरूपात आख्यायिका संक्रमित होतात. आख्यायिकाचा अवकाश मर्यादीत (लहान) असला तरी कथानक वेगवान असल्याने वाचक श्रोत्यांच्या मनावर त्या परिणाम करताना दिसतात. आख्यायिकांच्या आशयाचा सूक्ष्म अभ्यास केला तर त्यामध्ये स्थलपरत्वे, कालपरत्वे, प्रदेशपरत्वे, भाषानुरूप रचना ही बदलताना दिसते. कथा, आख्यायिका, कहाण्यामधील एकच आशय विविध रूपांमधून संक्रमित होताना दिसतो. परंतु त्यातील कथाबीज कायम राहिलेले आढळते.

आख्यायिकातील घटना प्रसंगाच्या चित्रणाचे स्वरूप, पात्राचे चित्रण, वातावरण निर्मिती, भाषिक गुण विशेष, धार्मिक समाजजीवन यांच्या आधारे अभिव्यक्तीच्या वैशिष्ट्यांचा विचार करणे गरजेचे आहे.

### १. घटना प्रसंगाच्या चित्रणाचे स्वरूप :

माणकेश्वर येथील शिव - सटवाई विषयक भगतांच्या कथागीतांतून आणि आख्यायिका मधून विविध घटना प्रसंगाचे चित्रण झालेले आहे. सटवाईचा अवतार, सटवाई नामकरण, सटवाईचे विधिलिखित, शिव व पार्वती लग्नप्रसंग तसेच शिव-सटवाई यांच्या भक्ताविषयीच्या उदात्त कार्याचे दर्शन घडते. दुष्टाचा संहार आणि सज्जनांचे कल्याण असा प्रमुख हेतू या अवतारामागे आहे.

## २. वातावरण निर्मिती :

माणकेश्वर येथील शिव - सटवाई विषयक गीते, आख्यायिकातील वातावरण बऱ्याच अंशी अद्‌भुतरम्य आहे. असे नाट्यपूर्ण वातावरण निर्माण होत असताना स्थळाची, काळाची वास्तवाच्या चित्रणाची बंधने काही प्रमाणात शिथिल झाली आहेत. भूतकाळातून वर्तमानात, वर्तमानातून भविष्यकाळात व पुन्हा वर्तमानात हवा तसा प्रवेश वातावरण निर्मितीमुळे सहजासहजी होऊ शकतो. उदा. शिवाचा अवतार, सटवाई आणि पार्वती यांच्या जीवनातील विविध प्रसंग इ. 'मेल्या मुडद्या ऽऽ', 'काळी कपिला गाय' यासारख्या आख्यायिकातून अतिशयोक्ती आणि योगायोगाचा वापर केल्याचे आढळते. शिव-सटवाईचा अवतार कथेत दैवी शक्तीने भारलेले गूढ वातावरण आहे. काही आधुनिक सामाजिक संदर्भ वातावरण निर्मितीच्या आधारे आलेले दिसतात. अशा लौकीक जीवनात शिव - सटवाईने आपले उदात्त व्यक्तिमत्त्व भक्तांच्या मनावर ठसावे म्हणून कांही दैवी चमत्कार केले आहेत. यामुळे अभ्यासात्मक नाट्य आख्यायिकामध्ये निर्माण झाले आहे.

## ३. आख्यायिकातून घडणारे धार्मिक समाजजीवन :

दैवतकथा या प्राचीन कथा होत. यांनाच आपण पुराणकथा असेही म्हणतो. समाजजीवनात दैवतकथा, आख्यायिका, कहाण्या यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा स्वरूपाच्या आख्यायिकांचा संबंध देवाधर्माशी येतो. दैवतविषयक आख्यायिकातून समाज जीवनाचे  दर्शन घडत असते. धर्मभावना जागृत ठेवण्याचे काम दैवत कथा करतात. भक्त आणि लोकांच्या मनावर असलेल्या ग्रामदैवतांचा प्रभाव त्यांच्याविषयी आत्मिक ओढ सदर आख्यायिकातून दृष्टिस पडते. आख्यायिक लोकसाहित्याचा भाग असल्यामुळे त्याचे कर्तृत्व बहुधा अनामिकच असते. ज्या लोकसमूहात त्या प्रचलित असतात, त्यांचे मन त्यांतून प्रतिबिंबीत होते. किंबहुना त्या लोकसमुहाचे मन हा त्या आख्यायिकाचा मुख्य आधार असतो.

### ४) आख्यायिका : लोकसंस्कृतीच्या वाहक :

आख्यायिकांवर कथ्थक, श्रोता, प्रदेश, प्रसंग या साऱ्या घटनांचा परिणाम होत असल्याने त्यात बदल होत जातो. स्थानिक आख्यायिकातून इतिहासाचे धागेदोरे जुळविता येतात. आख्यायिकात काळाच्या ओघात बरेच बदल घडून येतात, काही भाग विस्मरणात जातो. काही नव्याने अंतर्भूत होतो तरीसुद्धा मूळ गाभा तोच दिसून येतो. एका परीने आख्यायिका आपल्या तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक समाजजीवनाच्या वाटचालीचा आरसाच आहेत म्हणून त्यांना 'लोकसंस्कृतीचे वाहक' म्हणतात. आख्यायिका सांस्कृतिक जीवनाचा एक भाग बनल्या असून त्यामध्ये सामाजिक संदर्भ, मानवी मनाचे सूक्ष्मचित्रण, भाषिक सौंदर्य, रचनाकाराची सौंदर्यदृष्टी, ग्रामीण मन, जीवन ह्यांची अभिव्यक्ती होते. त्याचा जनमानसावर प्रभाव (Influence) असून एकाच आख्यायिकेची प्रदेशपरत्वे विविध रूपे आढळतात. त्यामुळे आख्यायिकेची सामुग्री चिकित्सक आणि तौलनिक अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण ठरते. शतकानुशतके चालत आलेल्या या आख्यायिकात काही मूळचे तथ्य असून त्यात सत्य घटनेचा अंश असतो. त्यामुळे त्याची जोपासना करणे गरजेचे आहे.

आख्यायिकांचे रूप ढोबळ असले तरी त्याला सौंदर्यमूल्य असते. श्रोत्यांना आकर्षित करून घेण्याचे सामर्थ्य असते. कल्पनाविष्कारामुळे आख्यायिकांत अनेकार्थ व्यक्त करण्याची क्षमता असते. आख्यायिकांना रचनातंत्राचे बंधन किंवा ठरीव साचा नसतो. माहिती असलेली घटना, प्रसंग सांगून झाला की आख्यायिका संपते. सामाजिक सुख, दु:ख, विधी - विधाने, कुलाचार याचा आशय आख्यायिकांनी टिपला आहे. आख्यायिकांमध्ये ग्रामीण बोलीभाषा, अतिशयोक्ती, पाल्हाळीकता कल्पनारम्यता, म्हणी, पौराणिक संदर्भ, दाखले, निवेदन शैली यांचा वापर करून कथ्थक भक्तांच्या मनाचा ठाव घेताना दिसतो. आख्यायिका जपून ठेवणाऱ्या मानव समाजाचे मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून (Psychological Perspective) विश्लेषण

केल्यास नवीन धागेदोरे सापडू शकतात. देवदेवतांचे प्रत्यक्ष मानवी रूप पाहिले नसले तरी लोकदैवतावरील विश्वास, कल्पनाशक्तीच्या आधारे प्रतिमा रेखाटन, त्याच्याविषयी मनात खोलवर रूजलेल्या संकल्पना, भीतीबरोबर भक्तीची ओढ, श्रद्धेतील निष्पाप भावना आख्यायिकेतून स्पष्ट होतात. त्यामुळे लोकदेवताही मानवी जीवन परिवाराचाच एक अविभाज्य भाग बनल्याचे जाणवतात.

## ४.५ समारोप :

आख्यायिका या मूलत: लोककथा आहेत. माणकेश्वराचे तत्कालीन लोकजीवन त्यातून प्रतिबिंबीत झाले आहे. त्या निव्वळ दैवतकथा, कल्पितकथा किंवा भाकडकथा नसून समाज, भाषा, संकेत, त्यांच्या धार्मिक कल्पना, लोक दैवताविषयीची असणारी श्रद्धा, विश्वास ह्यांच्या प्रभावी निदर्शक आहेत. पौराणिक आख्यायिका, कहाण्या, ओवी आख्याने ही समूह रंजक आहेत. त्यातून धार्मिक भावभानांचे भरणपोषण प्रामुख्याने केल्याचे दिसून येते.

माणकेश्वर येथील शिव - सटवाई मंदिर, आख्यायिका, गीतांचा कालिक आणि वाङ्मयीन दृष्टीने अभ्यास करताना यादव कालखंडाचा सांस्कृतिक इतिहास, धार्मिक, सामाजिक जीवन, त्यांच्या श्रद्धा, रूढी, रीतिरिवाज, जीवन विषयक कल्पना, उत्सव, सणवार कोणत्या स्वरूपाचे असतील? त्याच्या पाठीमागील कारण काय? याविषयी अंदाज बांधता येतो. ह्या परंपरा बऱ्याच राजवटीचा कालखंड उलटला तरी थोड्याफार फरकाने आजही टिकून असलेल्या दिसतात. माणकेश्वर तसेच परिसरातील समाज जीवनाच्या चित्रणाबरोबर त्या परिसराशी संबंधीत असणारा इतिहास उलघडण्यास हा मौखिक स्वरूपातील वाङ्मयीन ठेवा उद्‌बोधक मार्गदर्शक ठरतो.